**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ३१ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **ही लोकसभा निवडणूक देश, संविधान आणि प्रत्येकाचा हक्क वाचवण्यासाठी आहे- दिल्लीत इंडिया आघाडीच्या महारॅलीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रतिपादन.**
2. **आज पश्चिम नागपुरातील दाभा इथून भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या लोकसंवाद यात्रेला सुरुवात.**
3. **मतदारसंघात ताकद मिळावी म्हणून भाजपकडून उमेदवार पळविणं सुरू' -वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप.**
4. **पूर्व विदर्भातील बहुतांश ठिकाणी आज हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता.**

*****

इंडिया आघाडीची महारॅली

देशात यंत्रणांचा गैरवापर सुरू असून, इव्हीएम नसेल तर भाजपा १८० जागाही जिंकू शकत नाही, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. ते दिल्लीत रामलीला मैदानावर सुरू असलेल्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या महारॅलीत बोलत होते. ही निवडणूक देश, संविधान वाचवण्यासाठी आणि प्रत्येकाचा हक्क वाचवण्यासाठी आहे, असं ते म्हणाले. शरद पवार, उद्धव ठाकरे, तसंच अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांच्या पत्नी यांच्यासह इंडिया आघाडीचा भाग असलेले अनेक नेते या रॅलीत सहभागी झाले आहेत. याआधी आपला देश हुकूमशाहीकडं वाटचाल करत असल्याची शंका वाटत होती; पण आता ही शंका वास्तवात उतरली असल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. दरम्यान, २०२४ च्या

निवडणुका भारताला विकसित बनविण्यासाठी असून भारत लवकरच तिसरी जागतिक आर्थिक शक्ती बनेल, असं प्रतिपादन भाजपचे नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेरठमध्ये रॅलीला संबोधित करताना केलं.

नितीन गडकरी / विकास ठाकरे

भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज पश्चिम नागपुरातील दाभा इथून आपल्या लोकसंवाद यात्रेला सुरुवात केली. रॅलीला सुरुवात करण्यापूर्वी नितीन गडकरी यांनी हनुमान मंदिरामध्ये पूजन करत रॅलीचा प्रारंभ केला. गडकरी काढत असलेल्या रॅलीचा हा भाग, विद्यमान आमदार आणि काँग्रेसचे लोकसभा उमेदवार विकास ठाकरे यांच्या विधानसभा मतदारसंघाचा भाग आहे. दरम्यान, इंडिया आघाडी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी महागाई, बेरोजगारी अशा अनेक प्रश्नांनी देशातील नागरिकांचं अवघड झालेलं जीवन सुखाचं करण्यासाठी या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पाठीशी ठाम उभं राहण्याचं आवाहन जनतेला केलं. ते काल नागपूर मध्य विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या मेळाव्याला देवडिया काँग्रेस भवन, महाल इथं संबोधित करत होते.

बहुजन समाज पक्ष

बहुजन समाज पक्षाचे नागपूर लोकसभा मतदारसंघासाठीचे उमेदवार योगेश लांजेवार यांनी उत्तर नागपुरातील इंदोरा बुद्ध विहार इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष आर्य नागार्जुन भदंत सुरई ससाई यांची भेट घेतली.

प्रकाश आंबेडकर

महाविकास आघाडीमध्ये वंचित आघाडीला जागा देण्याबाबत कोणताही निर्णय होत नव्हता, तसंच वंचित बहुजन आघाडीचं सामर्थ्य आणि अभिमान यांनाही जागा नव्हती. त्यामुळंच आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज नागपूरमध्ये वार्ताहर परिषदेत सांगितलं. यावेळी त्यांनी भाजपच्या राजकारणावरही टीका केली. ज्या मतदार संघात महायुतीचं प्राबल्य नाही, तिथं उमेदवार पळवणं, इतर पक्षांमध्ये फोडाफोडी करणं, मनसेशी हात मिळवणं असे प्रकार भाजप करत असल्याचा आरोपही आंबेडकर यांनी यावेळी केला.

मान्यताप्राप्त राजकीय पक्ष

उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यात पहिल्या टप्प्यातल्या पाच लोकसभा मतदारसंघांत १३ जणांनी माघार घेतल्यानं, ९७ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. रामटेकमध्ये २८ उमेदवार रिंगणात असून त्यात मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांत राजू पारवे-शिवसेना शिंदे गट, श्यामकुमार बर्वे-काँग्रेस, आणि संदीप मेश्राम-बहुजन समाज पार्टी यांचा समावेश आहे. तर, नागपूरमध्ये २६ उमेदवार रिंगणात असून, त्यात मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारात, नितिन गडकरी-भाजप, योगेश लांजेवार-बहुजन समाज पार्टी आणि विकास ठाकरे-काँग्रेस यांचा समावेश आहे.

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीवरून उद्या, सोमवार दिनांक एक एप्रिलपासून सादर केला जाणार असून, सायंकाळी सव्वासात ते साडेसात वाजेदरम्यान, आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता

येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्त विभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युब चॅनलवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

नाना पटोले

महाविकास आघाडीसाठी चांगलं वातावरण असून पहिल्या टप्प्यात विदर्भातील पाचही जागांवर काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार मोठ्या मताधिक्क्यानं विजयी होतील. लोकसभा निवडणुकीत जनता भारतीय जनता पक्षाच्या तानाशाही सरकारला सत्तेतून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. आज मुंबई इथं टिळक भवनमध्ये पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पत्रकारांशी बोलत होते.

ईस्टर

ईस्टर हा सण आज जगभरात उत्साहानं साजरा होत आहे. या सणाच्या पूर्वसंध्येला काल मध्यरात्री देशभरातल्या विविध चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आल्या. पोप फ्रांसिस यांनी काल सायंकाळी वॅटिकन शहरातल्या सेंट पीटर बॅसिलिका चर्चमध्ये सुमारे दोन तास सामुदायिक प्रार्थना केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देश-विदेशातल्या ख्रिस्ती बांधवांना ईस्टरनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचं स्मरण म्हणून साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि सौहार्दाचं प्रतीक असल्याचं मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही देशवासियांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत, तर या सणाच्या माध्यमातून राष्ट्रीय ऐक्याला तसंच शांततेला चालना मिळेल, अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली आहे.

## गिरीश गांधी फाऊंडेशन पुरस्कार

'ज्ञानोबा, तुकोबा आणि विनोबा हे तीनच मराठी साहित्यिक भविष्यात श्रेष्ठ साहित्यिक म्हणून ओळखले जातील', असं प्रतिपादन डॉ. अभय बंग यांनी आज नागपुरात केलं. गिरीश गांधी फाऊंडेशनच्या कार्यक्रमात 'साहित्य आणि समाज' या अनुषंगानं मांडणी करतांना त्यांनी आजच्या साहित्याबाबत चिंता व्यक्त केली. गिरीश गांधी फाऊंडेशन नागपूरच्या वतीनं दरवर्षी मराठी सारस्वतांना त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवलं जातं. या अंतर्गत यंदाचा मल्हारराव काळे स्मृती समीक्षा पुरस्कार नागपूर शहरातील साहित्यिक विचारवंत तसंच नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ.प्रमोद मुनघाटे यांना प्रदान करण्यात आला. आज सकाळी धनवटे सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ.अभय बंग यांच्या हस्ते मुनघाटे यांना सन्मानित करण्यात आलं. त्याचप्रमाणं मीरादेवी पिंचा स्मृती लेखन पुरस्कार यवतमाळ इथले ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संतोष अरसोड यांना, तर पुरुषोत्तम गाडगे स्मृती काव्य पुरस्कार बुलढाणा इथले कवी आणि गजलकार डॉ.गणेश गायकवाड यांना प्रदान करण्यात आला.

## निवडणूक खर्च

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक खर्चावर देखरेखीसाठी जिल्हा तक्रार समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्ष जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा असून नागपूर आणि रामटेक मतदारसंघाचे खर्च संनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी विलीन खडसे आणि सिमा नन्होरे हे सदस्य सचिव आहेत. तक्रारीच्या अनुषंगानं रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी नोडल अधिकारी सिमा नन्होरे-मो.क्र.9404834043 आणि नागपूर लोकसभा मतदारसंघासाठी नोडल अधिकारी विलीन खडसे मो.क्र.-

8446247686 यांच्याशी नागरिकांनी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

माध्यान्ह भोजन समिती

विद्यार्थ्यांमधील बॉडी मास इंडेक्स कमी किंवा जास्त असल्याचं निदर्शनास आल्यानंतर सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजनात खिचडीऐवजी स्थानिक पातळीवर उत्पादित कडधान्यं, बाजरी आदी भरडधान्यं, भाज्या आणि फळं यांचा समावेश करण्याची शिफारस नागपूरचे प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या अध्यक्षतेतील पाककृती समितीनं केली आहे. मनोहर यांच्या अध्यक्षतेखालील ही आठ सदस्यीय राज्य-नियुक्त समिती विद्यार्थ्यांच्या आहाराची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्य वाढविण्यासाठी राज्याच्या मध्यान्ह भोजन मेनूमध्ये सुधारणा सुचवणार आहे.

आंबेडकरवादी पुरस्कार

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आज १० वा वर्धापन दिन साजरा करीत आहे. हे महामंडळ विदेशात 'आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन' घेत असतं. या संस्थेच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त आज अनेक लेखकांना आणि समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. आज नागपुरात विदर्भ साहित्य संमेलन इथं हा कार्यक्रम पार पडला.

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता अहमदाबाद इथं सुरू झालेल्या गुजरात टायटन्स विरुद्ध सनरायजर्स हैदराबाद या सामन्यात हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय

घेतला. सनरायजर्स हैदराबादनं २० षटकांत ८ गडी गमावून १६२ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं, तेव्हा गुजरात टायटन्स ७ षटकांत १ गडी गमावून ५८ धावांवर खेळत असून जिंकण्यासाठी त्यांना आणखी १०५ धावांची गरज आहे. दरम्यान, आयपीएलचा दुसरा सामना आज संध्याकाळी साडेसात वाजता विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपरकिंग्ज्स यांच्यात होणार आहे.

हवामान

राज्याच्या काही भागांमध्ये काल अवकाळी पाऊस झाला. नागपुरात काल काही भागात वादळी वाऱ्यासह आणि विजेच्या कडकडाटासह पाऊस पडला. प्रादेशिक हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार वर्धा आणि यवतमाळसह पूर्व विदर्भातील बहुतांश ठिकाणी आज हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. घराबाहेर पडताना खबरदारी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या चोवीस तासात विदर्भात कमाल तापमान वाशिम इथं ४१.४ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. दरम्यान, कालचं नागपूरचं कमाल तापमान ३९ पूर्णांक २ आणि किमान तापमान २३ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं. येत्या दोन दिवसांत विदर्भातील हवामान कोरडं राहणार असून सायंकाळी वातावरण ढगाळ राहील. या आठवड्यात तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसची वाढ होणार असून चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.